सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, लातूर

दुरध्वनी क्र.–(०२३८२)२५८९६९ e-mail:- dyceogenlatur@gmail.com

---

# अनुकंपा नियुक्ती आदेश

वाचा :-1.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा-1093/2335/प्र.क्र.90/93/आठ, दिनांक 26 आक्टोंबर 1994

2.शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-अराप-1098/प्र.क्र.2052/15 दिनांक 12 मार्च,1999.

3.ग्राम विकास विभागाचे पत्र.क्रमांक-1000/प्र.क्र./2820/15 दिनांक 21 जुलै, 2000.

4.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा.1000/प्र.क्र.20/2000/आठ दिनांक 28 मार्च,2001.

5.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक.प्र.क्र.59/2000/आठ,दिनांक 24.9.2001

6.शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक अकंपा-1004/प्र.क्र.51/2004/आठ दिनांक 22.8.2005

7.शासन परिपत्रक.क्रमांक.अकंपा-1009/826/प्र.क्र.201/09/आठ दिनांक 5.2.2010

8.शासन परिपत्रक.क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.अकंपा/1010/प्र.क्र..244/आठ दि.13.10.2010

9.शासन निर्णय.क्रमांक.अकंपा-2014/प्र.क्र.26/आस्था-9 दिनांक 20 ऑगष्ट,2015

10.शासन निर्णय.क्रमांक:अकंपा 1217/प्र.क्र.102/आठ दिनांक 21 सप्टेंबर, 2017

11.शासन निर्णय.क्रमांक:अकंपा-1219/प्र.क्र.56/आठ दिनांक 11 सप्टेंबर, 2019

12.उप सचिव, महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.यांचे प.क्र.2021/प्र.क्र.9/आ-7/दि.8 मार्च 2021.

जा.क्र.जिपला/साप्रवि/अंकपा/सीआर- /कार्या-7/कावि-
सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,लातूर.
दिनांक :- 17 जुलै 2021.

**आदेश :-**

ज्या अर्थी संदर्भिय आदेश क्रमांक 11 च्या शासन निर्णयान्वये गट-क संवर्गातील रिक्तपदे भरण्यासाठी निर्बधातून वगळण्यात आलेली आहेत.

ज्या अर्थी मी,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार व उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिनांक 22.8.2005 नंतरच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षा सूचीवरील रकाना क्रमांक 03 मधील खालील दर्शविलेल्या उमेदवारांची अनुकंपा कारणास्तव जिल्हा परिषद सेवेत शैक्षणीक पात्रता व उपलब्ध रिक्त पदानुसार जिल्हा सेवा (गट-क) या संवर्गातील पदावर त्यांचे नावासमोर रकाना क्रमांक 08 मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पुढील शर्ती व अटीस अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अक्र | मयत कर्म-याचे नाव व मृत्यूवेळी कार्यरत पदनाम | नियुक्ती द्यावयाचे वारस अर्जदाराचे नांव व रकाना 2 मधील कर्मचा-यांशी नाते | नियुक्तीचे पद | वेतनश्रेणी | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग जात प्रवर्ग | उमेदवाराचा निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे नियुक्तीचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | यमले व्यंकट पुडंलीक सह शिक्षक | यमले ब्रम्हदास व्यंकट मु.पो. तळणी (मो) ता.रेणापूर | केंद्र प्रमुख | S-15 41800-132300 | इमाव | इमाव | कारेपूर ता. रेणापूर |

<u>उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे..</u>

1.सदर आदेश मिळाल्यापासुन 15 दिवसाचे आत पदस्थापनेच्या जागी उपस्थित व्हावे अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द समजण्यात येईल.

2.पदस्थापनेच्या जागी रुजू होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

3.सदरची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणतेही कारण न दर्शविता सेवेतून कमी करता येईल.

4.जिल्हा परिषदेची सेवा सोडावयाची असल्यास एक महिना पूर्वसूचना/नोटीस द्यावी लागेल किंवा एक महिण्याचा मूळ पगार जिल्हा निधीत जमा करुन राजीनामा मंजूर करवून घेणे आवश्यक राहील.

5.उपस्थित होताना नियमानुसार विहित नमुन्यातील लेखी करारपत्र (एग्रीमेंट) संबंधित अधिकारी/कार्यालय प्रमुखाकडे द्यावे लागेल.

6.जिल्हा शल्य चिकित्सक यांचेव्दारे शारिरिकदृष्टया पात्र ठरविण्याच्या प्रमाणपत्राच्या अधिनतेने नियुक्ती देण्यात येत आहे.

7.शासनाचे जिल्हा परिषदेचे वेळोवेळीचे आदेश/सुचना/नियमांचे पालन करणे बधंनकारक राहील.

8.महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम 1967 मधील नियम 6(5) नुसार सदर पदावर परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असेल परंतु संबंधित उमेदवाराचे काम सदर परिविक्षा कालावधीत आवश्यक त्या दर्जाचे नाही असे आढळून आल्यास परिविक्षा अवधी वाढविण्यात येईल.

9.गट-क च्या पदावर नियुक्ती झाल्याने उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967 मधील नियम 8 नुसार शासनाने विहित केलेली तसेच वेळोवेळी विहित करीत अशा विभागीय परीक्षा/भाषा परिक्षा/प्रशिक्षण अर्हता विहित संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहील.

10.आपणास सदर पदावर देण्यात येणारी नियुक्ती शासन पत्र दिनांक 21.7.2000 अन्वये जेष्टतेनुसार आणि रिक्त असलेल्या पदावर नेमणूक देण्यात येत असल्याने ती स्वीकारणे बंधनकारक आहे.सध्याची नेमणूक नाकारल्यास आपली अनुकंपा तत्वावरील नेमणूक रद्द करण्यांत येईल.

11.सदर अनुकंपा उमेदवारास मयत कर्मचा-यांचे कुटूंबातील इतर सदस्यांचे पालन पोषण/सांभाळ करणेबाबत शपथ्पत्र उपस्थित होताना कार्यालय प्रमुखाकडे देणे बंधनकारक राहील.

12.आपली नियुक्ती जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधीन राहील या बाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निर्दशनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

13.आपणास शासनाने नव्याने दिनांक 1.4.2015 पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील.मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीचे अशंराशीकरण) नियम 1974 आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

14.आपणास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक 28 मार्च 2001 मधील तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

15.अनुकंपा नियुक्तीकरिता सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती बाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी/नियुक्तीसाठी सादर केलेली माहीती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्यावर व कोणत्याहीवेळी रद्द करण्यात येईल कोणतीही माहीती चुकीची/खोटी असल्याचे निर्दशनास आल्यास नियुक्ती कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

16.उमेदवाराने नियुक्तीपासुन 02 वर्षाचे आत एमएस-सीआयटी परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती संपूष्टात आणण्यात येईल.

17.मागास प्रवर्गातील उमेदवाराने त्यांची जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समितीकडून शासन निर्णय दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये 06 महिण्याच्या आत जातप्रमाणपत्राची वैधता

संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहिल.जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल व अशा उमेदवाराविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती-जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे) प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

19.महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम,2005 मधील तरतुदीनुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास आपण पात्र ठराल.

20.महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती लेखा संहिता 1968 परिशिष्ठ 6 नुसार उमेदवाराने वय व शैक्षणीक अर्हता बाबत खात्री झाल्याचे नियुक्ती अधिका-याचे प्रमाणपत्र प्रथम पगारपत्रकास जोडणे आवश्यक राहील.

21.आपणास प्रथम नियुक्तीच्या वेळी तसेच प्रत्येक वर्षी 31 मार्च च्या स्थितीत अनुसरुन मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करणे बधंनकारक राहील.

स्वाक्षरीत-

(अभिनव गोयल, भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद,लातूर

**प्रतिलिपी** :-

1.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.लातूर
2.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि.प.लातूर
3.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,लातूर
4.गट विकास अधिकारी पंचायत समिती रेणापूर
5.गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती रेणापूर
6.मुख्याध्यापक, केप्राशा कारेपूर ता.रेणापूर
7.संबंधितास

Abhinav

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,लातूर